**RNI No. MAHBIL /2009/40124**

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग पाच

**वर्ष ९, अंक ६(२)]   सोमवार, मार्च २०, २०२३/फाल्गुन २९, शके १९४४  [पृष्ठे ०६, किंमत : रुपये २६.००**

**असाधारण क्रमांक १२**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

---

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

महाराष्ट्र विधानसभेने दिनांक २० मार्च, २०२३ रोजी पुर:स्थापित करण्यात आलेले खालील विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियम ११६ अन्वये प्रसिद्ध करण्यात येत आहे :–

**L. A. BILL No. XIII OF 2023.**

*A BILL*

FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA STATE TAX ON PROFESSIONS, TRADES, CALLINGS AND EMPLOYMENTS ACT, 1975.

**सन २०२३ चे विधानसभा विधेयक क्रमांक १३.**

**महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करण्याकरिता विधेयक.**

१९७५ चा महा. १६.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ यामध्ये आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या चौ-याहत्तराव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर (सुधारणा) अधिनियम, २०२३, असे म्हणावे.

(२) तो, १ एप्रिल २०२३ रोजी अंमलात येईल.

सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या कलम २७अ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ (यात यापुढे, ज्याचा निर्देश "मुख्य अधिनियम" असा केला आहे), याच्या कलम २७अ मधील,— १९७५ चा महा. १६.

(१) खंड (क) ऐवजी, पुढील खंड दाखल करण्यात येईल :—

"(क)(एक) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ याच्या कलम २ च्या खंड (द) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे लक्षणीय दिव्यांगत्व असणारी कोणतीही व्यक्ती ; किंवा २०१६ चा ४९.

(दोन) लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या बालकाचे आई-वडील किंवा पालक,

जर, अशा लक्षणीय दिव्यांगत्व असणा-या व्यक्तीने किंवा बालकाने, उक्त अधिनियमाखालील किंवा त्यान्वये केलेल्या नियमांखालील प्रमाणित प्राधिकरणाने दिलेले दिव्यांगत्व प्रमाणपत्र धारण केले असेल तर :

परंतु, अशी व्यक्ती किंवा, यथास्थिति, मालक, ती या खंडान्वये ज्या पहिल्या आकारणी वर्षासाठी सूट मिळण्याचा दावा करीत असेल त्या वर्षासंबंधात विहित प्राधिकरणाकडे उपरोक्त प्रमाणपत्र सादर करील :

परंतु आणखी असे की, व्यक्तीने किंवा, यथास्थिति, मालकाने, दिनांक १ एप्रिल २०२३ च्या लगतपूर्वी असलेल्या या कलमाच्या प्रयोजनार्थ, विहित प्राधिकरणाकडे यापूर्वीच प्रमाणपत्र सादर केले असेल तर तिला पुन्हा ते सादर करण्याची आवश्यकता असणार नाही. " ;

(२) खंड (ई) वगळण्यात येईल ;

(३) खंड (ग) वगळण्यात येईल.

**३.** मुख्य अधिनियमाला जोडलेल्या **अनुसूची एक** मधील, नोंद १ ऐवजी, पुढील नोंद दाखल करण्यात येईल :— सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६ याच्या अनुसूची एक ची सुधारणा.

" १. वेतनदार व मजुरी मिळविणारे—

(एक) पुरुषांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) सात हजार पाचशे रुपयांहून अधिक परंतु दहा हजार रुपयांहून अधिक नाही ; | दरमहा एकशे पंचाहत्तर. |
| (क) दहा हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :-<br>(अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ;<br>(ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. |

(दोन) स्त्रियांच्या बाबतीत, ज्यांचे मासिक वेतन किंवा मजुरी,—

| | |
|---|---|
| (अ) पंचवीस हजार रुपयांहून अधिक नाही ; | काही नाही. |
| (ब) पंचवीस हजार रुपयांहून अधिक ; | दरसाल दोन हजार पाचशे हे पुढील पद्धतीने देण्यात येतील :-<br>(अ) फेब्रुवारी महिना वगळता दरमहा दोनशे ;<br>(ब) फेब्रुवारी महिन्यात तीनशे. ". |

## उद्देश व कारणे यांचे निवेदन.

सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्याच्या हेतूने, महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका आणि नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) यात पुढील सुधारणा करणे शासनास इष्ट वाटते,—

(क) ज्या महिलांचे मासिक वेतन किंवा मजुरी पंचवीस हजार रुपयांपर्यंत आहे त्यांना प्रदेय असलेल्या व्यवसाय करातून सूट देणे ;

(ख) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ (२०१६ चा ४९) याच्या तरतुदींच्या धर्तीवर लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तींसाठी सूट देण्याची व्याप्ती सुव्यवस्थित व विस्तारित करणे.

२. वरील उद्दिष्टे साध्य करणे हा, या विधेयकाचा हेतू आहे.

मुंबई,
दिनांक १६ मार्च, २०२३.

**देवेंद्र फडणवीस,**
उप मुख्यमंत्री.

## वित्तीय ज्ञापन

सन २०२३-२४, या वित्तीय वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणात अंतर्भूत असलेले प्रस्ताव अंमलात आणण्यासाठी महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका व नोक-या यांवरील कर अधिनियम, १९७५ (१९७५ चा महा. १६) याच्या कलम २७अ व अनुसूची एक ची सुधारणा करण्यासाठी हे विधेयक प्रस्तावित केले आहे. हे विधेयक, राज्य विधानमंडळाचा अधिनियम म्हणून अधिनियमित झाल्यावर, राज्याच्या एकत्रित निधीतून आवर्ती किंवा अनावर्ती खर्चाचा अंतर्भाव असणारी कोणतीही तरतूद या विधेयकात नाही.

**भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ अन्वये राज्यपालांची शिफारस**

(महाराष्ट्र शासन विधी व न्याय विभाग, आदेशाची प्रत)

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २०७ याच्या खंड (१) अन्वये महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून, ते महाराष्ट्र राज्य व्यवसाय, व्यापार, आजीविका नोक-या यांवरील कर (सुधारणा) विधेयक, २०२३ पुरःस्थापनार्थ घेण्याबाबत महाराष्ट्र विधानसभेस शिफारस करीत आहेत.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २० मार्च, २०२३.

**राजेन्द्र भागवत,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.